महाराष्ट्र शासन

**शासकीय तंत्रनिकेतन, नाशिक**

( महाराष्ट्र शासनाची शैक्षणिक स्वायत्त संस्था )

चेहडी (बु.!!), सामनगांवरोड, नाशिकरोड, नाशिक पिनकोड - ४२२१०१ **दुरध्वनी क्र.** ०२५३-२४६१२२१

**Email Id:** office.gpnashik@dtemaharashtra.gov.in **Web:** www.gpnashik.ac.in

जावक क्रमांक : शातंनिना/लेखा-१/२०२५/ 148 दिनांक : 14 JAN 2025

**परिपत्रक**

**विषय :- आयकर गणना विवरणपत्र आर्थिक वर्ष २०२४-२५ सादर करणेबाबत...**

आर्थिक वर्ष २०२४-२५ करीताचे आयकर विवरणपत्र तयार करण्यांसाठी वेतन व वेतनाव्यतिरिक्त प्राप्त होणारी रक्कम याची परिगणना करुन माहे फेब्रुवारी २०२५ चे वेतन देयकातून आयकराची अंतिम कपातीची रक्कम कार्यालयाला कळविणे अनिवार्य असल्याने या परिपत्रकान्वये संस्थेतील सर्व अध्यापक अधिकारी व कर्मचा-यांना सूचित करण्यांत येते की, खालील नमूद करण्यांत आलेल्या सुचनेनुसार कार्यवाही करुन आयकराचे अंतिम विवरणपत्र स्वाक्षरी करुन दिनांक. १५.०२.२०२५ पर्यंत कार्यालयातील लेखा विभागात श्रीमती. सुरेखा मोरे , वरिष्ठ लिपीक यांचेकडे जमा करावे. आयकर विवरणपत्र विहीत कालावधीत कार्यालयातील लेखा विभागाकडे प्राप्त न झाल्यास संबंधित अध्यापक अधिकारी / कर्मचारी यांचे माहे फेब्रुवारी २०२५ चे वेतन आहरीत करणे शक्य होणार नाही. याची नोंद घ्यावी.

१. आर्थिक वर्ष २०२४ - २५ मधील कार्यालयाकडून अदा करण्यांत आलेल्या वेतनाचा सविस्तर तपशिल संबंधितांनी शक्यतो लेखा व कोषागार कार्यालयाच्या महाकोष सेवार्थ पोर्टल वर लॉगिन करुन उपलब्ध करुन घ्यावा. वेतनाचा तपशिल **पीडीएफ** स्वरुपात लेखा विभागात उपलब्ध करुन देण्यांत आलेला आहे.
२. आयकर गणना विवरणपत्र (Annexure II) संस्थेच्या www.gp nashik.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले असून, सदर विवरणपत्र **OLD TAX REGIME व NEW TAX REGIME** यापैकी जे फायदेशीर असेल त्याचा निर्णय वैयक्तिक स्वरुपात घ्यावयाचा आहे. त्यानुसार परिगणना करुन त्याची प्रत कार्यालयाला सादर करावी.
३. आयकर कपातीबाबत नियमानुसार आयकर वजावटी मधून सूट प्राप्त करुन घेण्यासाठी योग्य ते दस्ताऐवज सादर करावेत.
४. माहे जानेवारी २०२५ च्या वेतनातून कपात करावयाच्या आयकराची रक्कम २४.०१.२०२५ पर्यंत लेखा विभागास कळविण्यांत यावी.
५. वेतना व्यतिरिक्त इतर मानधनाच्या रकमेचा तपशिल कार्यालयातील रोखपाल यांचेकडून प्राप्त करुन घेवून आयकर गणना पूर्ण करुन घ्यावी.

( डॉ.गोरक्ष विठ्ठलराव गर्जे)
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, नाशिक

प्रत:- सर्व विभाग यांना माहिती व कार्यवाहीकरीता.

यंत्र (प्रथम पाळी/द्वितीय पाळी), अणुविदयुत (प्रथम पाळी/द्वितीय पाळी),स्थापत्य(प्रथम पाळी/द्वितीय पाळी), उपयोजितयंत्र, विदयुत, स्वयंचलन, प्लास्टीक, डी.डी.जी.एम,आय.डी.डी, पदार्थविज्ञान (रसायनशास्त्र,गणित, इंग्रजी), संगणक व माहिती तंत्रज्ञान विभाग, परिक्षा विभाग, कर्मशाळा, ग्रंथालय, वसतीगृह, कार्यालय.

२/- त्यांना कळविण्यात येते की, सदरचे परिपत्रक आपल्या विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून दयावे.

प्रत:- रोखपाल, शासकीय तंत्रनिकेतन, नाशिक यांना माहिती व कार्यवाहीकरीता.

२/- त्यांना कळविण्यांत येते की, सर्व अधिकारी/कर्मचा-यांच्या मानधनाच्या रक्कमेचे प्रपत्र लेखा विभागाकडे उपलब्ध करून देणेसाठी विहीत वेळेपूर्वी जमा करावे.

प्रत:- विभागप्रमुख संगणक, शासकीय तंत्रनिकेतन, नाशिक यांना माहिती व कार्यवाहीकरीता.

२/- त्यांना कळविण्यांत येते की, सदरील परिपत्रक व विवरणपत्र संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यांत यावे.